# १०० दिवसांचा कृती आराखडा-नगर विकास विभाग (नवि-१)

| अ. क्र. | मुद्दा | कार्यवाही पूर्ण/ अपूर्ण | पूर्ण असल्यास त्याबाबतची माहिती व शासन निर्णय/फोटो/ इ. अभिलेख किंवा त्याची लिंक | अपूर्ण असल्यास सद्यस्थिती व कार्यवाही पूर्ण करण्याची काल मर्यादा |
|---|---|---|---|---|
| १ | नगर रचना संचालनालयातील गट-ब (सहायक नगर रचनाकार, रचना सहायक, कार्यालयीन अधिक्षक, उच्चश्रेणी लघुलेखक, निम्नश्रेणी लघुलेखक, स्वीय सहायक, प्रमुख आरेखक) व गट-क (वरिष्ठ लिपिक, प्रथम लिपिक, कनिष्ठ लिपिक, कनिष्ठ आरेखक, सहायक आरेखक, अनुरेखक) यांच्या बदल्या ऑनलाईन पध्दतीने करणे. | कार्यवाही पूर्ण | कार्यवाही पूर्ण, शासन निर्णय क्रमांक-बदली-५८२४/प्र.क्र.१४८ /भाग-१/नवि-२७, दिनांक २४.०३.२०२५ (प्रत सोबत जोडली आहे.) सन २०२५ ची बदली प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने सुरु झाली आहे. (URL-https://mahaehrms.nic.in) https://drive.google.com/file/d/१ZUiAP३pDkRre१३wYWiwT३KE-Ux५८X१gK/view?usp=sharing | - |
| २ | नगर रचना संचालनालयाच्या कर्मचाऱ्यांसाठी मानव संसाधन व्यवस्थापन प्रणाली e-hrms (रजा,सेवापुस्तक व गोपनीय अहवाल) प्रणाली लागू करणे. | कार्यवाही पूर्ण | ई-रजा बाबत आदेश दिनांक १२.१२.२०२४, गोपनीय अहवाल याबाबतचे आदेश दिनांक ३०.०१.२०२५ (प्रत सोबत जोडली आहे.) (URL-https://mahaehrms.nic.in) https://drive.google.com/file/d/१nnS१Z_Hi१EBfSNeRCiRrarDdM९yoxu२p/view?usp=sharing | |
| ३ | नगर रचना संचालनालयातील कामाचा व्याप लक्षात घेऊन रिक्त असलेली पदे भरण्याची आवश्यकता असल्याने २५० रचना सहायक पदांसाठी भरती प्रक्रीया पूर्ण करणे. | कार्यवाही पूर्ण | २६१ रचना सहायक पदभरतीसाठी निवड यादी दिनांक ०६.०३.२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यानुसार कागदपत्रे तपासणी करुन नियुक्ती देण्याची कार्यवाही सुरु आहे. | |
| ४ | महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन धोरणानुसार विकास परवानगीसाठी एकत्रित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमध्ये (UDCPR) मध्ये आवश्यक सुधारणा करणे. | कार्यवाही पूर्ण | दिनांक ०६.०२.२०२५ रोजी शासन निर्णय निर्गमित (प्रत सोबत जोडली आहे.) https://drive.google.com/file/d/१ewBgsTTyxDavmVjqCzOhUmx_WwPmLg५y/view?usp=sharing | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | पुणे, नाशिक, नागपूर, छत्रपती संभाजी नगर या महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांमध्ये विहित सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी आवश्यकतेप्रमाणे मनुष्यबळाची नियुक्ती/ भरती करणे. | कार्यवाही पूर्ण | प्राधिकरणातील प्रतिनियुक्तीची पदे आवश्यकतेप्रमाणे (पुणे-८९, नाशिक-१९, छ.संभाजीनगर-१५) भरण्यात आली आहेत. तसेच PMRDA मध्ये सरळसेवेने भरावयाच्या ६२ पदांसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे दिनांक २१.०२.२०२५ रोजी मागणी सादर करण्यात आली आहे. या व्यतिरिक्त पुणे प्राधिकरणामध्ये १४ व नाशिक प्राधिकरणामध्ये १३ पदे कंत्राटी पध्दतीने भरण्यात आली आहेत. | |
| ६ | नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ यांना जोडणाऱ्या मेट्रोसाठी अंमलबजावणी यंत्रणा आणि प्रक्रिया (बीओटी किंवा ईपीसी) निश्चित करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करणे. | कार्यवाही पूर्ण | नगर विकास विभागाच्या दि.२७/०१/२०२५ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे मुंबई मेट्रो मार्ग-८ (छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ) हा मेट्रो प्रकल्प सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्त्वावर उभारण्यास शासनाची तत्वत: मंजुरी देण्यात आली आहे. सदर प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल सल्लागाराकडून सिडकोकडे सादर होणे अपेक्षित आहे. | |
| ७ | नवी मुंबई शहराच्या विकासासाठी खारघर येथे आंतरराष्ट्रीय कॉर्पोरेट पार्क विकसित करण्याची प्रक्रिया सुरु करणे. | कार्यवाही पूर्ण | इरादा पत्र दिनांक ०४.०४.२०२५ रोजी देण्यात आले आहे. (प्रत सोबत आहे.) https://drive.google.com/file/d/१I५ScH५१ErwcajvUfDp९EO३-q७csR३R६n/view?usp=sharing | |
| ८ | मरीन ड्राइव्ह परिसरात मरीना विकसित करण्यासाठी प्रक्रिया सुरु करणे. | कार्यवाही पूर्ण | विकास योजना व हरकती/सूचनांवर सुनावणीसाठी तज्ञ समिती गठीत करण्यात आली असून त्यावर सुनावणी प्रक्रीया सुरु झाली आहे. | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९ | शहराचे सौंदर्यीकरणाचे दृष्टीने आरोग्य सुविधा, वाहतूक व दळण-वळण सेवा सुविधा करण्याच्या दृष्टीकोनातून व विकास योजनेची प्रभावी अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीकोनातून दहा लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या महाराष्ट्रातील सर्व शहरांसाठी "अर्बन डिझाईन युनिट" स्थापन करणे. | कार्यवाही पूर्ण | अर्बन डिझाइन युनिट स्थापन करणेसाठी दिनांक २८.०३.२०२५ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. https://drive.google.com/file/d/१७०kXyLuenbY_e९ot_L८iVwNJgoIDvp२i/view?usp=sharing | |
| १० | अ)नवी मुबईमध्ये परवडणारी घरे उपलब्ध होण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना व अल्प उत्पन्न गटासाठी सुमारे २६,००० घरांचे वाटप करणे. | कार्यवाही पूर्ण | घरांच्या वाटपासाठी दिनांक १९.०२.२०२५ रोजी संकेतस्थळावर लॉटरी काढण्यात आली आहे. त्यानुसार घरांच्या वाटपाची कार्यवाही सुरु आहे. | |
| ११ | ब)प्रधानमंत्री आवास योजना व अल्प उत्पन्न गटासाठी सिडकोमार्फत आणखी ४१,००० घरांचे वाटप करण्याची योजना आखणे. | कार्यवाही पूर्ण | उर्वरित घरांच्या वाटपांचे नियोजन सिडकोमार्फत करण्यात आलेले आहे. | |
| १२ | शासनाच्या गृहनिर्माण धोरणाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने राज्याच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये आवश्यक बदल करण्यासंदर्भात नगर विकास विभागाचे अभिप्राय देणे. | कार्यवाही पूर्ण | गृहनिर्माण विभागास वेळोवेळी नगर विकास विभागाचे अभिप्राय देण्यात आलेले आहेत. | |
| १३ | शहरालगतच्या क्षेत्राचा विकास सुनियोजितपणे होण्यासाठी व शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत होण्यासाठी ३०० शहरालगतच्या सुमारे ३,५०० गावांमध्ये रस्त्यांचे जाळे मंजूर करणे. | कार्यवाही पूर्ण | दिनांक २७.०३.२०२५ रोजी शासन निर्णय निर्गमित (प्रत सोबत आहे.) https://drive.google.com/file/d/१५U७X८S५ql-NxwMHL९X६४aBWLL७१xVl३Y/view?usp=sharing | |
| १४ | राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सुमारे ५० विकास आराखडयांना मान्यता देणे. त्यामध्ये प्रामुख्याने छ.संभाजीनगर महानगरपालिका, इस्लामपूर, अमळनेर, राजगुरुनगर, पंढरपूर विकास प्राधिकरण, चंदगड, मोहोळ, येवलेवाडी नगर परिषद यांचा समावेश आहे. | कार्यवाही पूर्ण | मंजुर विकास योजना आराखडयांची सविस्तर अधिसूचना निर्गमित करण्याची कार्यवाही सुरु आहे. | |
| १५ | शहराच्या सुनियोजित विकासासाठी राज्यामध्ये १० नगर नियोजन योजना (TPS) मंजूर करणे. यामध्ये प्रामुख्याने नरयो क्रमांक ३ अवताळे हांडेवाळी, नरयो क्रमांक २ वडाची वाडी, नरयो क्रमांक ४ होळकर वाडी, नरयो क्रमांक ११ मांजरी खुर्द पोलवाडी, नरयो क्रमांक १० फुरसुंगी, नरयो क्रमांक ६ उरळी देवाची, नरयो म्हाळुंगे-माण यांचा समावेश आहे. | कार्यवाही पूर्ण | ९ नगर नियोजन योजना मंजूर झाल्या असून त्यांच्या अधिसूचना निर्गमित करण्याची कार्यवाही सुरु आहे. उर्वरित एका योजनेची मान्यता अंतिम टप्प्यात आहे. | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १६ | शहराची वाढती लोकसंख्या आणि वेगाने होणारे नागरीकीकरण तसेच राजयातील स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांच्या शहरासाठी स्थानिक क्षेत्र योजना तयार करण्याकरीता व शहरी वाहतूक निधी (UTF) वापरून स्थानिक क्षेत्र आराखडा (LAP) तयार करण्यासाठी SOP तयार करणे आणि TOD क्षेत्रांच्या स्थानिक क्षेत्र आराखड्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळवणे. | कार्यवाही पूर्ण | दिनांक ०४.०४.२०२५ रोजी शासन निर्णय निर्गमित (प्रत सोबत जोडली आहे) https://drive.google.com/file/d/१XaOXluw३Fw३l-hbRlR३eqYmO५xIHx७wr/view?usp=sharing | |
| १७ | सोलापूर शहरासाठी महत्वपूर्ण असलेली पाणीपुरवठा योजना स्मार्ट सिटी मार्फत पूर्ण करणे. | कार्यवाही पूर्ण | सोलापूर नळ पाणीपुरवठा योजनेचे काम पूर्ण झालेले आहे. | |
| १८ | नवी मुंबईतील घनकचऱ्याची समस्या लक्षात घेऊन त्याची योग्य पध्दतीने विल्हेवाट लावणेसाठी एकात्मिक घनकचरा व्यवस्थापन आणि कचऱ्यापासून ऊर्जा निर्मिती प्रकल्पासाठी कंत्राटदार नियुक्त करणे. | कार्यवाही पूर्ण | कंत्राटदार नियुक्तीचे इरादा पत्र दिनांक ०२.०४.२०२५ (प्रत सोबत आहे.) https://drive.google.com/file/d/१VBeQOtW_७८z१W२Hn२qdZW_ehGBq६HlwQ/view?usp=sharing | |
| १९ | महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ मधील कलम ३७, १२७, ४९ व कलम २० या कलमांची अंमलबजावणी तात्काळ होण्याच्या दृष्टीकोनातून तसेच न्यायालयीन प्रकरणांमध्ये कालबंध कार्यवाही करणे झोन बदलाची कार्यवाही सुलरित्या वहित मुदतीत करण्याकरीता तसेच फेरबदलाची कार्यवाही विहित मुदतीत होण्याकरीता "विधी, विदिशा,विमोचन, विमुक्त, रुपांतर व परिवर्तन" ही ऑनलाईन प्रणाली Online Unified GIS Portal च्या माध्यमातुन कार्यान्वित करणे. | कार्यवाही पूर्ण | शासन निर्णय निर्गमित दिनांक १५.०४.२०२५ (प्रत सोबत जोडली आहे.) (URL-https://tpvdmah.in/homepage/आणि dtp.maharashtra.gov.in) https://drive.google.com/file/d/१GT०wJWturUOfDBsjK३amDx४JNhl२HOi६/view?usp=sharing | |
| २० | राज्यातील बांधकाम / रेखांकन व अन्य विकास परवानगी प्रकरणे ऑनलाईन द्वारे दाखल करणे तसेच अशा प्रकरणांना ऑनलाईन BPMS/ AUTO /UDCPR वापरुन सर्व विशेष नियोजन प्राधिकरणासाठी BPMS ची अंमलबजावणी करणे. | कार्यवाही पूर्ण | दिनांक ०३.०४.२०२५ शासन निर्णय निर्गमित (प्रत सोबत जोडली आहे.) (URL-https://mahavastu.maharashtra.gov.in/) https://drive.google.com/file/d/१९xYpa६vr_PZD९B_५bOiMibAIOZGgBQu८/view?usp=sharing | |
| २१ | राज्यातील बांधकाम / रेखांकन व अन्य विकास परवानगी प्रकरणे BPMS द्वारे प्रमाणिकरणासाठी तसेच ऑनलाईन विकास परवानगीची प्रक्रीया अधिक सुलभ आणि कार्यक्षम व जलद होण्याच्या दृष्टीकोणातून तसेच तांत्रिक मनुष्यबळास | कार्यवाही पूर्ण | दिनांक ०३.०४.२०२५ रोजी शासन निर्णय निर्गमित (प्रत सोबत जोडली आहे) https://drive.google.com/file/d/१WDcgx_n२FCgZ | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | रोजगाराच्या नविन संधी उपलब्ध होणेकरीता व राज्यामध्ये एकसमान नियमांची अंमलबजावणी करणेकरीता फ्रंट यूजर इंटरफेस विकसित करण्यासाठी BPMS जेसन फाईल फॉरमॅटला अंतिम स्वरुप देणे. | | Bu३mwC-OdZFAbDQxSjcH/view?usp=sharing | |
| २२ | संबंधित प्राधिकरणाच्या हद्दीमधील आरक्षणे विकसित करणे व पायाभूत सुविधांसाठी निधीची उभारणी करण्याची गरज लक्षात घेऊन विविध महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अधिकारक्षेत्रातील सरकारी जमिनी संबंधित महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांना हस्तांतरीत करणे. | कार्यवाही पूर्ण | प्रस्तावास शासनाची मान्यता मिळाली असून शासन निर्णय निर्गमित करण्याची कार्यवाही सुरु आहे. | |
| २३ | केंद्र शासनाच्या भारमंडपम प्रकल्पाच्या धर्तीवर आंतरराष्ट्रीय कार्यक्रमाचे आयोजन करणे, व्यापार मेळावे, अधिवेशन, परिषदा व इतर महत्वाचे कार्यक्रम आयोजित करण्याच्या दृष्टीकोणातून तसेच उद्योग- व्यवसायीकांनासाठी एकत्र येण्याचे एक केंद्र असावे व त्यामध्ये विविध पायाभूत सुविधा असाव्यात या उद्देशाने राज्यातील बृहन्मुंबई, ठाणे, नागपूर, पुणे, नाशिक महानगरपालिकांच्या विकास योजनांमध्ये किंवा या शहरांलगतच्या भरतमंडपमच्या धर्तीवर मोठया कन्व्हेन्शन सेंटरच्या विकासाची प्रक्रिया सुरु करणे. | कार्यवाही पूर्ण | दिनांक २०.०३.२०२५ शासन निर्णय निर्गमित (प्रत सोबत आहे.) https://drive.google.com/file/d/१GmwB७७TTrazaW३RtSL५A_pEQvvE५LLvM/view?usp=sharing | |
| २४ | हस्तांतरणीय विकास हक्क (TDR) खरेदी विक्री करणेकामी तसेच टीडीआर प्रमाणपत्रांच्या व्यवहारांसाठी इलेक्ट्रॉनिक प्लॅटफॉर्म म्हणजेच ई-टीडीआर सुरु करणे. यामध्ये सुरुवातीस बृहन्मुंबई महानगर पालिकेमध्ये अंमलबजावणी सुरु करण्यात आली असून राज्यातील अन्य महानगरपालिकांमध्ये त्याची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. | कार्यवाही पूर्ण | प्रणालीचे उद्घाटन दिनांक २२.०४.२०२५ मा.मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते करण्यात आले असून ऑनलाईन प्रणाली सुरु झाली आहे. (URL- https://etdr.mcgm.gov.in/BPMSClint/default.aspx) | |
| २५ | ठाण्यात सिडकोकडून नागरी नूतनीकरण योजनेंतर्गत (युआरएस) सुमारे ३,८०० घरांचे बांधकाम सुरु करणे. | कार्यवाही पूर्ण | ठाणे नागरी पुनरुत्थान प्रकल्पांतर्गत किसान नगर ठाणे येथे व्यवसायिक क्षेत्र आणि ऑनसाईट पायाभूत सुविधांच्या विकासासह अंदाजे ३,८३३ सदनिकांचे | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | बांधकाम करण्यासाठी मे.बी.जे.शिर्के या कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात आली असून घरांच्या बांधकाम प्रक्रियेस सुरुवात झाली आहे. | |
| २६ | राज्यातील अनेक पायाभूत प्रकल्पासाठी निधी पुरवठा सुरळीत होण्याच्या दृष्टीने सर्व महत्वाच्या सार्वजनिक वाहतूक प्रकल्पांसाठी दायित्व नोंदणी प्रणाली विकसित करणे. | कार्यवाही पूर्ण | दायित्व नोंदवही विकसित करण्यात आली असून त्यामध्ये मेट्रो प्रकल्पासाठीची दायित्व नोंद करण्याची कार्यवाही करण्यात येत असून राज्यातील अन्य प्रकल्पांचीही नोंद यामध्ये करण्यात येणार आहे. | |
| २७ | नवी मुंबईतील लॉजिस्टिक्स पार्कचा मास्टर प्लॅन करुन विकसित करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करणे. | कार्यवाही पूर्ण | लॉजिस्टिक्स पार्कचा मास्टर प्लॅन करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली आहे. | |
| २८ | नवी मुंबईमधील वाढती पाण्याची गरज भागविण्याची आवश्यकता लक्षात घेऊन सिडकोमार्फत कोंढाणे धरणाच्या बांधकामाचे कंत्राट देणे. | कार्यवाही पूर्ण | कोंढाणे धरणाच्या बांधकामाची निविदा अंतिम करुन कंत्राट देण्यात आले आहे. | |
| २९ | ठाणे-नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ रस्त्याच्या जोडणीसाठी डीपीआर पूर्ण करणे आणि सुमारे रु.६५०० कोटी खर्चाच्या प्रकल्पाची अंमलबजावणी सिडकोमार्फत HAM अंतर्गत करण्यास मान्यता देणे. | कार्यवाही पूर्ण | प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर केला आहे. | |
| ३० | शहरातील शहरी वाहतुकीचे एकात्मिक नियोजन, व्यवस्थापन आणि समन्वय सुनिश्चित करण्यासाठी एकत्रिकृत महानगर वाहतूक प्राधिकरण (Unified Metropolitan Transport Authoriry ) कायद्याचा मसुदा तयार करणे. | कार्यवाही पूर्ण | एकत्रिकृत महानगर वाहतूक प्राधिकरण (UMTA) कायद्याचा मसुदा तयार करण्यात आला आहे. | |
| ३१ | राज्याच्या विकास योजनाची अधिक परिणामकारक अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीकोणातून तसेच विकास योजना आरक्षणांची व रस्ते आणि इतर सुविधा विकसित होण्याचे दृष्टीकोणातून राज्यातील सर्व नियोजन प्राधिकरणांना निदेश /सुचना देणे तसेच मार्गदर्शक तत्वे निश्चित करणे करीता नगर विकास विभागाचे नाविन्यपूर्ण धोरण तयार करणे. | कार्यवाही प्रगतीपथावर आहे. | | प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर ठेवण्यात येत आहे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३२ | मुंबई मेट्रो मार्ग ३ (कुलाबा -वांद्रे- सीप्झ) ही मार्गिकेतील दुसरा टप्पा ( बीकेसी ते आचार्य अत्रे चौक वरळी) पर्यंत वाहतूकीसाठी चालू करण्यात येणार आहे. | कार्यवाही प्रगतीपथावर आहे. | | मुंबई मेट्रो मार्ग - ३ च्या बीकेसी ते आचार्य अत्रे चौक (वरळी) हा टप्पा कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने सर्व चाचण्या पूर्ण झाल्या असून, सार्वजनिक वाहतुकीसाठी खुला करण्याचे नियोजित आहे. तसेच उर्वरीत आचार्य अत्रे चौक (वरळी) ते कफ परेड (कुलाबा) हा अखेरचा टप्पा खुला करून संपूर्ण मार्गिका जुलै, २०२५ पर्यंत सार्वजनिक वाहतुकीसाठी कार्यान्वित करण्यात येईल. |
| ३३ | नवी मुंबई मेट्रो लाईन १ बी (पेंधार - तळोजा एमआयडीसी ) आणि लाईन २ (पेंधार - नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ ) प्रकल्पांसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल अंतिम करणे. | कार्यवाही प्रगतीपथावर आहे. | | नवी मुंबई मेट्रो मार्ग-१ बी आणि २ चे एकत्रीकरण करून नवी मुंबई मेट्रो मार्ग-२ (पेंधार - खांदेश्वर - नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ) अशी सलग मेट्रो मार्गिका उभारण्याचे निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार नवी मुंबई मेट्रो मार्ग-२ या मेट्रो मार्गिकेचा सविस्तर प्रकल्प अहवाल करण्यास सल्लागाराला कार्यादेश देण्यात आले आहेत. सल्लागार कडून येत्या ३ महिन्यात सविस्तर प्रकल्प अहवाल प्राप्त होणे अपेक्षित आहे. |
| ३४ | सिडको क्षेत्रातील नवीन जमीन विकास पद्धतींसाठी नियमांचा मसुदा प्रकाशित करणे. | कार्यवाही प्रगतीपथावर आहे. | | प्रस्तावित प्रकल्पाऐवजी नवी मुंबईच्या आर्थिक विकासासाठी पर्यायी मॉडेल आखणे या प्रकल्पाचा समावेश करण्यात आला असून यासंदर्भात अभ्यास करण्यासाठी नियुक्त एजन्सीला दि.२४/१२/२०२४ रोजी कार्यादेश देण्यात आला आहे. सल्लागार संस्थेने प्राथमिक अहवाल दि.१७/०३/२०२५ रोजी सादर केला असून, अहवालाची छाननी करण्यात येत आहे. नवी मुंबईतील जमीन विल्हेवाटीसाठी धोरण आणि नियम तयार करण्याचे काम सुरु असून, त्यासाठी ३ महिन्यांचा कालावधी अपेक्षित आहे. |